# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र State जिल्हा बृहन्मुंबई District पोलीस ठाणे ला.प्र.वि. Police Station पहिली खबर क्र. 09 FIR No. वर्ष 2026 Year दिनांक 25/4/26 Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections 07
 (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
 (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day बुधवार तारीख पासून Date from 22/4/26 वेळ Time 14:40 तारीख पर्यंत Date to 24/04/26 वेळ Time 18:15

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 22/04/2026 वेळ Time 11:00

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 01/26 तारीख Date 25/04/2026 वेळ Time 04:15

4. माहितीचा प्रकार Type of Information समक्ष लेखी / तोंडी Written / Oral ~~तोंडी~~, लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बी.एम.सी. नॉर्थ वॉर्ड, माटुंगा (प.) मुंबई ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka मुंबई जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name सुषमा खोत (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name सुशांत खोत

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 19/6/1990 (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9930001249

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी

(g) धर्म Religion हिंदू जात Caste मराठा जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address ........ गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road 504, A विंग, ... आत्मन रेसिडेन्सी जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place गाव Village कल्याण (प) पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

विशाल भालचंद्र पाणी, वय 31 वर्षे, पद - दुय्यम अभियंता.
रा. ठी. B/602, वरद हाईट्स, बिल्डिंग 12, टिळकनगर, चेंबूर
मुंबई - 89.

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

Scanned with OKEN Scanner

# फिर्याद

श्रीमती सुषमा सुशांत खोत यांचा स्वतंत्र कागदावर जबाब टंकलिखित करण्यात आला असून तोच या गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावा.

समक्ष

(प्रविण पावले)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि, मुंबई.

पोनि सुषमा खोत

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक :- २५/०४/२०२६

श्रीमती सुषमा सुशांत खोत, वय ३६ वर्षे, व्यवसाय-नोकरी, (पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई, वरळी) रा.ठी. ५०४, ए विंग, गुरू आत्मन रेसीडन्सी, योगीधाम कल्याण पश्चिम. मो.क्र. ९१३०००१२४९.

-----------

मी वरीलप्रमाणे असून, नमूद पत्त्यावर माझे कुटुंबासह राहत आहे. मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई वरळी येथे दि. २०/०८/२०२५ रोजी पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

मी बुधवार दिनांक २२/०४/२०२६ रोजी कर्तव्यावर हजर असताना, मला व सहाय्यक पोलीस आयुक्त प्रविण पावले यांना मा.अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्र. २७/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता नेमणुक केली म्हणुन लेखी आदेश दिल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार नामे श्री अशोककुमार इंद्रदेव पाल, रा.ठि. डी'८०२, आर.एन.ए. ग्रँड,महाराष्ट्र नगर, कांदिवली पश्चिम,मुंबई -६७, मोबाईल ९९३०९०००४८ यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली, त्यांनी सांगितले की, तक्रारदार श्री अशोककुमार इंद्रदेव पाल हे मागील १५ वर्षापासून जमिनीचे खोदकाम (Excavation) करण्याचे कॉन्ट्रॅक्ट घेतात. त्यांची ओम इंटरप्रायजेस नावाची प्रोपरायटरशीप कंपनी आहे. मे.टेन एक्स रिअल्टी ईस्ट लि.या विकासक कंपनीने त्यांचे 'मे ओम इंटरप्रायजेस' कंपनीला एस.आर.ए. सी.एच.एस. जय भवानी अॅन्ड अजिंक्यतारा एस.आर.ए. सी.एच. एस. आणि अष्टविनायक, एस.आर.ए. सी.एच.एस., या प्रोजेक्टकरीता सी.एस.नंबर ४ व ७ साल्टपन विभाग, एफ/एन वार्ड, एम.सी.जी.एम. शास्त्रीनगर, सायन (पुर्व), मुंबई २२ याठिकाणी बांधकाम साईटवर खोदकामाचे काम दिले असून तक्रारदारांचे तेथे मागील ४ महिन्यांपासून काम चालू आहे. त्याबाबत दिनांक ०४/१२/२०२५ रोजी तक्रारदार यांच्या मे. ओम इंटरप्रायजेस कंपनीला मे.टेन एक्स रिअल्टी ईस्ट लि. या विकासक कंपनीने वर्कऑर्डर दिली आहे.

तक्रारदारांचे वर नमुद शास्त्रीनगर सायन पुर्व येथील चालू असलेल्या कामाचे ठिकाणी बृहन्मुंबई महानगर पालिका, एफ नॉर्थ वॉर्ड चे घनकचरा व्यवस्थापन (SWM-Solid Waste Mangement) विभागाचे अधिकारी अधून मधून तपासणीकरता येत असतात.

साधारण दीड महिन्यापूर्वी तक्रारदार, त्यांचे इतर स्टाफ सोबत वरनमुद शास्त्रीनगर सायन पुर्व येथील साईट वर असताना काही लोक तेथे आले व ते बी.एम.सी. एफ नॉर्थ वॉर्ड, घनकचरा विभागाचे अधिकारी असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदारांना साईट वर स्वच्छता नाही, नियम पाळत नाहीस, परमिशन नाही असे बोलून ५० लाख रूपये फाईन भरावा लागेल असे सांगितले. तसेच स्टॉप वर्क नोटीस देऊन काम थांबवितो, असे धमकावून सांगितले. त्यावेळी तक्रारदारांनी त्या साहेबांना ते आता साफसफाई ठेवतील असे त्यांनी सांगितले असता, साहेबांनी तक्रारदारांना फाईन भरायचा नसेल आणि स्टॉप वर्क नोटीस नको असेल तर त्यांच्या दोघांचे आणि वाणी साहेब यांचे मिळुन एकुण १० लाख रूपये दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी तक्रारदारांनी त्यांना रक्कम जास्त असून थोडे कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी तक्रारदारांना ''आता जेवढे असतील तेवढे दे आणि उर्वरीत रक्कमेची लवकरात लवकर व्यवस्था करून वाणी साहेबांना ऑफीसला भेट म्हणजे वारंवार काम थांबणार नाही'' असे बोलले. म्हणुन तक्रारदारांनी घाबरून त्यांना तक्रारदार यांचा स्टाफ जितू वर्मा यांचेमार्फतीने रू. ५०,०००/- दिले. त्यावेळी तक्रारदारांनी, त्यांना त्यांची नावे विचारले असता त्यांनी त्यांची नावे दिनेश सोहनी आणि एकाने कदम साहेब असल्याचे सांगितले. तसेच वाणी साहेब कोण आहेत, हे विचारले असता त्यांनी एफ नॉर्थ वॉर्ड चे घनकचरा विभागाचे इंजिनियर असल्याचे तक्रारदारांना सांगितले.

दिनांक २०/०४/२०२६ रोजी साधारण दुपारी ०२.०० वाजताचे सुमारास तक्रारदार यांचा सहकारी जितू वर्मा हा साईट वर असताना बी.एम.सी. चे काही अधिकारी आले. त्यांच्यापैकी एका साहेबांनी जितूकडे तक्रारदारांबाबत विचारणा केली असता तक्रारदार बाहेर असल्याचे जितू वर्मा ने सांगितले. त्यावेळी त्या साहेबाने स्वतःची ओळख वाणी साहेब असल्याचे जितू वर्माला सांगितले आणि बोलले की, '' साईट पे कचरा पडा है, साफसफाई भी नही है, डिवॉटरींग का परमीशन लिया नही है फिर भी काम चालू है, तुम्हारे

Scanned with OKEN Scanner

बॉस को ऑफीस मे आके मिलने को बोलो और तब तक काम चालू मत करो'' असे बोलून ते निघून गेले. सदर घटनेबाबत स्टाफ वर्मा ने तक्रारदारांना फोन करून कळविले. दिनांक २१/०४/२०२६ रोजी पुन्हा काही अधिकारी तक्रारदारांचे साईटवर आल्याचे वर्मा ने फोन करून कळविले व तक्रारदारांना वाणी साहेबांनी एफ नॉर्थ बी.एम.सी. वॉर्ड येथे भेटायला बोलावले असल्याचे सांगितले.

दिनांक २२/०४/२०२६ रोजी सकाळी सहकारी वर्मा याने तक्रारदारांना फोन करून कळविले की, डिवॉटरिंगची परवानगी संबंधीत आणि उर्वरीत रक्कमेबाबत बोलण्यासाठी बी.एम.सी. चे वाणी साहेब व सोहनी साहेब यांनी त्यांचे ऑफीस एफ नॉर्थ वॉर्ड मध्ये भेटण्यास बोलाविले आहे.

तक्रारदार यांची नमूद बी.एम.सी. एफ नॉर्थ वॉर्ड चे अधिकारी इंजिनियर श्री विशाल वाणी तसेच त्यांचा स्टाफ श्री दिनेश सोहनी आणि श्री कदम यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदारांनी दिनांक २२/०४/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी येथे नमुद लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यास आले असल्याचे सांगुन तसा लेखी अर्ज दिला.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री स्वप्निल रमेश कुंभार, वय - ३५ वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - राज्यकर निरीक्षक, कार्यालयीन पत्ता - विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय, ३ रा मजला, एच विंग, वस्तू व सेवा कर भवन, नवीन इमारत, माझगांव, मुंबई - १०, रा.ठी. हरी व्हिला, रूम नं. ४०४, ४ था मजला, न्यु सेक्टर, ५०, सिवुड दारावे, नवी मुंबई., मोबाईल क्रमांक ८४५९०४७०४२, आधारकार्ड नं. ४१७१६६६०१७६४, २) श्री. विशाल काशीनाथ धाबे, वय ३६ वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - राज्यकर निरीक्षक, कार्यालयीन पत्ता - विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय, ३ रा मजला, एच विंग, वस्तू व सेवा कर भवन, नवीन इमारत, माझगांव, मुंबई - १०, रा.ठी. आयजी पार्क बिल्डीग, रूम नं. ३०४, ३ रा माळा, सेक्टर - ४, करंजाडे, पनवेल. मो. ८५५४०३०४३८, आधारकार्ड नं. २६१३२९८३०६९८ यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रार अर्ज पंचास वाचण्यास दिला. पंचांचा तक्रार अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सपोआ प्रविण पावले, तक्रारदार तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

त्यानंतर मी व सपोआ पावले आम्ही पंचास सांगितले कि, तक्रारदार यांनी लाप्रवि कार्यालयात दिनांक २२/०४/२०२६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने पंचासमक्ष लाचेच्या मागणी संदर्भात पडताळणी करण्याकरीता तक्रारदार अशोककुमार पाल यांना लोकसेवकाच्या कार्यालयात भेटण्याकरीता पाठविण्यात येणार असून भेटी दरम्यान लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्यास तसा पडताळणी पंचनामा करण्यात येईल. तक्रारदार, पंच व पोलीस पथक यांना मी व सपोआ प्रविण पावले यांनी पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तसेच पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार व लोकसेवक यांच्या प्रत्यक्ष भेटीतील संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरच्या मदतीने ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही, सपोआ पावले, दोन्ही पंच, तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. गायकवाड यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डरची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर आम्ही, दोन पंच, व पोलीस पथक पडताळणी कारवाई करीता दोन शासकीय वाहनाने तसेच तक्रारदार व सपोआ पावले हे तक्रारदार यांच्या खाजगी वाहनाने १४.४० वाजता बृहन्मुंबई महानगर पालिका एफ नॉर्थ, माटुंगा कार्यालयाकडे रवाना झालो. पडताळणीतील एका शासकीय वाहनातील पथकाला दादर परिसरात पुढील आदेश मिळेपर्यंत थांबून राहण्याच्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर आम्ही लोकसेवकाच्या कार्यालया पासून काही अंतरावर वाहने थांबविली.

समक्ष
(प्रविण पावले)
सहा. पोलीस आयुक्त
ला प्र वि, मुंबई

पोनि सुषमा खोत

Scanned with OKEN Scanner

तक्रारदार श्री. पाल हे लोकसेवक विशाल वाणी यांची प्रत्यक्ष भेट घेण्याआधी त्यांचे कार्यालयातील दिनेश सोहनी यांना त्यांचे मोबाईल फोनवर कॉल करून लोकसेवक वाणी यांच्या भेटीची वेळ व ठिकाण याबाबत विचारणा करणार आहेत. त्यानुसार सपोआ प्रविण पावले, आम्ही, पोह.गायकवाड, पंच धाबे व तक्रारदार असे शासकीय वाहनात बसलो. तक्रारदार हे दिनेश सोहनी यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. गायकवाड यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९९३०९०००४८ यावरून स्पीकर ऑन करून लोकसेवक वाणी यांचे कार्यालयातील श्री. दिनेश सोहनी यांस त्यांचे मोबाईल नं. ८८५०४२२९९६ यावर कॉल करून झालेले संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यात आले. ती वेळ १५.३३ ही होती. नमुद संभाषणामध्ये तक्रारदार यांनी दिनेश सोहनी यांस लोकसेवक विशाल वाणी यांना भेटण्यासाठी कार्यालयास येऊ का? असे विचारले असता त्यांनी 'हा आजाव' असे सांगितले.

वरीलप्रमाणे तक्रारदार व लोकसेवक यांचे कार्यालयातील दिनेश सोहनी यांचे मोबाईलवरील झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून दिनेश सोहनी यांनी तक्रारदार अशोक कुमार पाल यांना लोकसेवक विशाल वाणी यांना भेटण्याकरीता कार्यालयात येण्यास सांगितले असल्याने सदरवेळी लोकसेवक हे तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात का ? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. तक्रारदार, पंच व पोलीस पथक यांना मी व सपोआ प्रविण पावले यांनी पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. पडताळणी करीता तक्रारदार व त्यांच्या सोबत पंच नामे श्री. विशाल काशीनाथ धाबे यांना कार्यालयात पाठविण्याचे ठरले. त्यानुसार टेक्निशियन गायकवाड यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बाजूस बनियनला लावून पंचासह लोकसेवक यांच्या कार्यालयाकडे रवाना केले. थोडया वेळाने १६.२१ वा. दोघेही परत आल्यानंतर त्यांचेकडून माहिती घेतली तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण पंच धाबे यांच्यासमक्ष आम्ही ऐकले. त्यामध्ये लोकसेवक वाणी यांनी पाल यांचे एक्सकेवेशन काम असून ते डिवॉटरिंगच्या परमिशन बाबत विचारणा केली. डिवॉटरिंगच परमिशन डेव्हलर्पर यांना घेणे आवश्यक असल्याचे श्री वाणी यांनी सांगून सदरचे परमिशन घेण्याबाबत तक्रारदार यांना सांगितले. तसेच '' तो ये डिवॉटरींग का पेनल्टी भरो। और जो भी चार्जेस आता है वो भरो। आप परमिशन इश्यु कराके लेलो, लिगल चार्जेस भरना है उसका, लिगल चार्जेस देड लाख रूपया है। छे महिने का परमिशन मिलता है।, मै तो नोटीस भी बनाया है एक्चुली। परमिशन लेना ही पडेगा। हा। तो देड लाख रूपया लिगल चार्जेस है, वन ल्याख फिफ्टी फाईव्ह थाऊझन्ट।'' त्यावर तक्रारदारांनी त्यांना ''ठिक है, और आपका क्या रहेंगा वो भी क्लिअर कर दो।'' असे विचारले तेव्हा लोकसेवक वाणी यांनी '' पेनल्टी का और वो सब मिलाके टु पॉईन्ट फाईव्ह।' हा। अदर दॅन लिगल चार्जेस। ' असे सांगितले त्यावर तक्रारदार यांनी ''अदर दॅन लिगल चार्जेस। इसमें आपका भी हो गया, साहब का भी हो गया (लोकसेवक सोहनी यांचेकडे अंगुलीनिर्देश करून) फिर मेरेको कोई देना नही।'' असे विचारले, तेव्हा लोकसेवक वाणी ''उनको कोई लेना देना नही।'' असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी ''टु पॉईन्ट फाईव्ह में आपका हो गया। और आपके साहब का।'' अशी विचारणा केली, तेव्हा लोकसेवक वाणी '' वो परमिशन देने के बाद का बात कर रहा हु, मै आपको। और वो जो लिगल भरने का है उसका तो चलान मिलेगा आपको। छे महिने का परमिशन रहेगा। '' असे म्हणाले त्यावर तक्रारदार '' ऑन्ली सिक्स मन्थ। हम लोग को तो लास्ट टाईम कंटीन्यु मिलता था वन टाईम।'' असे विचारले तेव्हा लोकसेवक वाणी यांनी '' नही वन टाईम नहि मिलता।'' असे सांगीतले तेव्हा तक्रारदार ''जो भी लेगेगा सर पर हरबार मुझे देड लाख देना पडेगा।'' असे म्हणाले त्यावर लोकसेवक वाणी यांनी ''नही हरबार नही देना पडेगा। वो जो जब आप आओ तब बताऐंगें। आपने अगर रूल्स फॉलो किया तो। एडजस्ट करेंगे।'' असे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक वाणी यांनी ''ये क्या वन टाईम परमिशन है, और बल्क टाईप प्रोजेक्ट परमिशन है। तो हर टाईम डेव्हलपर देड लाख रूपया नही भर पाता। हर कोई हर दम देड लाख रूपया नही देता है। ये बल्क प्रोजेक्ट में कंन्सीडर करके उसमें ऐसा एक क्लॉज होता है सर की, आपको दो बार मिनिमम मतलब उसको रिन्यु कराना है, परमिशन को। तीस हजार रूपया आपको भरने को आएगा।'' असे सांगीतले त्यावर तक्रारदार '' और आपका उपर का चार्जेस क्या होता है।'' लोकसेवक वाणी '' वो तो वही है।'' तक्रारदार '' कितना बोले टू पॉईन्ट फाईव्ह। टू पॉईन्ट फाईव्ह ल्याखस् मतलब मुझे कितना हो गया। तो तीन लाख चार लाख हो गया।'' लोकसेवक वाणी '' कैसे क्या?, वो डिस्काऊन्ट कियाना आपको वही तो हो गया।'' तक्रारदार '' तीस हजार वो हो गया, प्लस टु पाईन्ट फाईव्ह लाख आपका हो गया।'' लोकसेवक वाणी ''येस'' असे म्हणाले. अशाप्रकारे तक्रारदार अशोककुमार पाल व लोकसेवक विशाल वाणी यांचेमध्ये

Scanned with OKEN Scanner

चर्चा झालेबाबत तक्रारदार अशोककुमार पाल यांनी सांगितले. यावरुन लोकसेवक श्री. विशाल वाणी यांनी तक्रारदार यांचेकडे डिवॉटरिंगच परमिशन साठी अडीच लाख रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. तसेच लोकसेवक वाणी यांनी तक्रारदार यांना डिवॉटरिंगच परमिशनचा अर्ज करून मग लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच धाबे यांचेसमक्ष पडताळणी पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर तक्रारदार यांनी दि. २३/०४/२०२६ रोजी डिवॉटरिंग परमिशन बाबत अर्ज बी.एम.सी. कार्यालयास केला व दिनांक २४/०४/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयास आले. त्यानंतर मी व सपोआ प्रविण पावले यांनी पंच तक्रारदार व पोलीस पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची व करावयाची कारवाई याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये एक लाख रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू.१,००,०००/- (त्यामध्ये रू.५००/- दराच्या भारतीय चलनाच्या २०० नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. लोकसेवक यांनी अडीच लाख रूपये लाच मागणी केली असल्याने उर्वरीत दिड लाख ही खेळण्यातील रू.५०० दराच्या नोटा वापरण्यात आल्या. त्यानंतर पो.ह. कावले यांनी पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गूणधर्म समजावून सांगितले. पो.ह. कावले यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू.२,५०,०००/- (रू.१,००,०००/- भारतीय चलनातील रू.५००/- दराच्या नोटा व रू.१,५०,०००/- खेळण्यातील रू.५०० दराच्या नोटा ) रक्कमेतील नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम खाकी रंगाच्या दोन वेगेवेगळया लिफाफ्यात ठेवुन सदर लिफाफ्यांनादेखील बाहेरून अॅन्थ्रोसिन पावडर लावून ते लिफाफे एका पिशवीत ठेवून ती पिशवी तक्रारदार यांच्या ताब्यात दिली. त्यानंतर मी पोह. कावले हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले.

दिनांक २४/०४/२०२६ रोजी १३.४० वा लोकसेवकाचे कार्यालय बृहन्मुंबई महानगर पालिका एफ नार्थ वार्ड, माटुंगा येथे सापळा कारवाईकरिता रवाना झालो. त्यांनतर लोकसेवकाचे कार्यालयापासून काही अंतरावर थांबुन सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असुन तक्रारदार यांच्या सोबत पंच विशाल काशीनाथ धाबे यांना लोकसेवकास लाचेची रक्कम देण्याकरीता पाठविण्याचे ठरले. त्यानुसार तक्रारदार, पंच तसेच सापळा पथक यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा म्हणून डोक्यावरून हात फिरवण्याबाबत सांगण्यात आले.

तक्रारदार श्री. पाल हे लोकसेवक विशाल वाणी यांची प्रत्यक्ष भेट घेण्याआधी त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर कॉल करून भेटीची वेळ व ठिकाण याबाबत विचारणा करणार असल्याने पो.ह. गायकवाड यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९९३०९०००४८ यावरून स्पीकर ऑन करून लोकसेवक वाणी यांचे मोबाईल नं. ९०२८९२०२९४ यावर कॉल करून झालेले संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक यांना **' सर फोन किया था, मै मिटींग मे था'** असे बोलले असता, लोकसेवक तक्रारदार यांना **'नही वही मुझे वो ना एक्चुली हमारे वार्ड ऑफिसर साहब को एक्सवेशन परमिशन देखना था। इसके लिए आपको मॅसेज किया था। मुझे एक्सवेशन परमिशन मिल गया आपका मै दे दिया उनको दिखाया. वो चलान दिया उनको वो आऐगे। उनको भेजो, कल आपने जो लेटर हेड दिया उसपे एड्रेस था ही नही। मुझे एड्रेस लगता है ना, कंपनी का '** असे म्हणाले. तक्रारदार यांनी **'पेमेन्ट निचे कॅश काउंटर पे, कॅश चलेगाना सब'** असे म्हटल्यावर लोकसेवक वाणी यांनी **'हा चलता है, कॅश चलता है। कॅश और डिटेल भरो'** असे सांगितले व फोन कट केला.

त्यानंतर काही वेळाने डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो पो.ह. गायकवाड यांचे मार्फतीने तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लावला व तक्रारदार पाल व पंच क्र. २ श्री धाबे हे त्यांच्या खाजगी वाहनाने लोकसेवक यांना भेटण्याकरीता एफ नॉर्थ वार्ड बृहन्मुंबई महानगरपालिका माटुंगा या कार्यालयास रवाना झाले. काही वेळानंतर ते परत आले. सदरवेळी लोकसेवक हे कार्यालयात उपस्थित नसल्याचे समजले.

त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक विशाल वाणी यांना कॉल करून **' वो रसीद भर दिया सब वो जितुजीने '** असे सांगीतले. त्यावर लोकसेवक वाणी यांनी **'' मै हु आज अभी छे बजेतक। तो अभी भिजवा देते हो तो अभी क्लोज कर देता हु' आज करो गे। आज! लेकिन मै छे बजेतक हु, छे बजेतक हो जाऐगा**

समक्ष
(प्रविण पावले)
सपोआ, ला.प्र.वि., मुंबई

पोनि सुषमा खोत

Scanned with OKEN Scanner

**क्या आपका, तो बताईए मुझे ऐसा, मै बोल रहाहु आपको हा, वो जो बात कीया था हमने, उसकी बात कर रहा हु ना'** असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांना 'हा सर, साढे पाच तक आ जाता हु, हो गया है। साढे पाच, पाच चालीस के बिचमें आ जाता हु।' असे सांगितले. लोकसेवक यांनी ' मै ऑफिस में ही हु वैसे, इधर उधर बैठा रहता हु।' असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक विशाल वाणी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित असल्याने सापळा कारवाई सुरू करीत असल्याचे सांगून त्याअनुषंगाने तक्रारदार व पंच यांना सापळयाच्या अनुषंगाने योग्य सूचना दिल्या.

त्यानंतर पोह.गायकवाड यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बाजूस बनियनला लावून पंच विशाल धाबे यांच्यासह लोकसेवक यांच्या कार्यालयामध्ये पाठविले. तक्रारदार व पंच श्री धाबे हे एफ नॉर्थ वार्ड बृहन्मुंबई महानगरपालिका माटुंगा या इमारतीच्या मुख्य प्रवेशव्दाराने आत गेले. त्यांच्या मागोमाग सापळा पथक, पंच कुंभार असे एफ नॉर्थ वॉड या कार्यालयाच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अश्या रितीने थांबुन राहीले.

काही वेळानंतर तक्रारदार व पंच धाबे हे पुन्हा मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर आले. तक्रारदार यांनी त्यांच्या वाहनात ठेवलेली लाचेची रक्कम असलेली पिशवी घेतली व पुन्हा ते लोकसेवक वाणी यांच्या केबिनमध्ये गेले. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी, पंच कुंभार व अंमलदार हे लोकसेवक यांचे कार्यालय असलेल्या एफ नॉर्थ वॉर्ड बृहन्मुंबई महानगर पालिका कार्यालयाच्या आजूबाजूस पहिल्या मजल्यावर लोकसेवक यांच्या केबिनच्या बाहेर जावून कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहिले.

काही वेळात तक्रारदार श्री अशोककुमार पाल यांनी लोकसेवक यांच्या केबिनच्या बाहेर येऊन सापळा पथकास त्यांचा हात डोक्यावरून फिरवून लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा केला. केबिनच्या बाहेर थांबून असलेले पोलीस पथकाने लोकसेवक यांच्या केबिनमध्ये गेले व लोकसेवक श्री. विशाल वाणी यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. सदर लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव विशाल भालचंद्र वाणी, वय ३१ वर्षे, धंदा नोकरी पद - दुय्यम अभियंता, (नेमणुक : एफ नॉर्थ वार्ड/ बृहन्मुंबई महानगरपालिका, माटुंगा, मुंबई ) असे सांगितले तसेच पत्ता विचारला असता बी ६०२, वरद हाईटस्, बिल्डींग नंबर १२, टिळकनगर, चेंबुर, मुंबई असे सांगितले. सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक २२/०४/२०२६ रोजी आरोपी लोकसेवक श्री. विशाल भालचंद्र वाणी, वय ३१ वर्षे, धंदा नोकरी पद - दुय्यम अभियंता, (नेमणुक : एफ नॉर्थ वार्ड/ बृहन्मुंबई महानगरपालिका, माटुंगा, मुंबई) यांनी तक्रारदार श्री.अशोक कुमार इंद्रदेव पाल यांचेकडे डिवॉटरिंगच परमिशन नसल्याने नमुद परमिशन अर्जाच्या ॲडजेसमेंटसाठी रूपये अडीच लाख (अक्षरी रू.२,५०,०००/-) रकमेची लाचेची मागणी करुन दिनांक २४/०४/२०२६ रोजी सदर रुपये अडीच लाख (अक्षरी रू.२,५०,०००/-) लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडले, म्हणुन माझी लोकसेवक विशाल भालचंद्र वाणी, पद - दुय्यम अभियंता यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(प्रविण पावले)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

पोनि सुषमा खोत

Scanned with OKEN Scanner

40

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ विलंब नाही

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक श्री. विशाल आनंद्र वाणी वय-51 पद- दुय्यम अभियंता, पश्च नॉर्थ वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी तक्रारदार श्री. अशोक कुमार इन्द्रदेव पाल यांचेकडून डेकोरेशनचे परमिशन नसल्याने नमूद परमिशन घर्जीच्या अॅडजेस्टमेंट साठी रुपये अडीच लाख रकमेची लाचेची मागणी करून दि. 24/06/2026 रोजी सदर रुपये 2,50,000/- लाख लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून लोकसेवक विशाल वाणी यांचे विरुद्ध गु.र.क्र. 09/26 भ्र.प्र. अधिनियम 1988 चे कलम 07 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री. सागर आरगडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station 25/4/26

संपूर्ण नाव Name श्री. प्रविण पावले

पदनाम Rank सहायक पोलीस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्र. ........
Posting ला. प्र. वि., मुंबई

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 25/4/26
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner